# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजनेत कार्यरत असणारे शिक्षक विना वेतन कार्यरत असल्याबाबत**

**(१) २९७ (२२-१२-२०१४) श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र शासन पुरस्कृत अपंग समावेशित शिक्षण योजनेत कार्यरत असणारे शिक्षक तीन वर्षापासून विना वेतन कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शिक्षकांना त्यांचे थकीत वेतन मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय दिनांक ०४.१२.२०१४, दिनांक ०२-१२-२०१५ दिनांक ०८-११-२०१७ व दिनांक १०-१०-२०१८ अन्वये अपंग समावेशित शिक्षण योजना (माध्यमिक स्तर) अंतर्गत कार्यरत विशेष शिक्षकांचे केंद्र शासनाकडून प्राप्त मंजुरीनुसार वेतन अदा करण्यात आले आहे.

---

**राज्यात शाळा व्यवस्थापन समिती मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कला/क्रीडा/कार्यानुभव निर्देशकांना कार्यमुक्त केल्याबाबत**

**(२) ३५२८ (२२-१२-२०१४) श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. ५६० (२)

(१) राज्यात शाळा व्यवस्थापन समिती मार्फत सन २०१२-१३ मध्ये कला/क्रीडा/कार्यानुभव निर्देशकांना सन २०१२ रोजी नियुक्त करुन त्यानंतर दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजी कार्यमुक्त केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ व २०१४-२०१५ या सत्रासाठी यांना नियुक्ती न देता पद भरतीची जाहिरात काढून निर्देशकांना कार्यमुक्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने निवड समितीला पद भरती स्थगितीचे निर्णय दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १९ आणि अधिनियमाचे परिशिष्ट अ प्रमाणे १०० पेक्षा जास्त उच्च प्राथमिक शाळेमध्ये कला शिक्षण, शारिरिक शिक्षण आणि कार्यानुभव या विषयाचे अध्यापन करण्यासाठी अंशकालीन निदेशक नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी धोरण ठरविणेबाबत शासनास दिलेल्या निदेशास अनुसरुन शासनाने शासन निर्णय दिनांक २१/०८/२०१४ निर्गमित केला होता. सदरचा शासन निर्णय अधिक्रमित करुन अंशकालिन निदेशकांऐवजी अतिथी निदेशकांचे पथक तयार करण्याबाबत दिनांक ०७-१०-२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. तद्नंतर दिनांक ०७-०१-२०1७, ०१-०६-२०१७ व ०१-०९-२०1७, शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत दिनांक ०१-०९-२०1७ शासन निर्णय मा.उच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आला आहे.

---

## राज्यातील खासगी शाळांच्या संचमान्यतेच्या प्रक्रियेला व शाळांच्या पुनर्मूल्यांकनाला स्थगिती दिल्याबाबत

**(३) ५८४९ (०९-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी शाळाच्या संचमान्यतेच्या प्रक्रियेला व शाळांच्या पुनर्मूल्यांकनाला शासनाने तात्पुरती स्थगिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१५ च्या शैक्षणिक वर्षात बालवाड्यांना अनुदान देण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने कोणती भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९)** :(१), (२), (३) व (४) सद्य:स्थितीत शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ अन्वये संचमान्यता केल्या जातात. सन २०१६-१७ च्या संचमान्यतेचे बहुतांश काम पूर्ण झाले आहे.

शाळांच्या पुनर्मुल्यांकनाला स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणतेही निदेश दिलेले नाहीत.

---

**सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमधील अनेक शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रलंबित असल्याबाबत**

**(४) २३८२४ (१०-०८-२०१५) श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित शाळांमधील अनेक शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हापरिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री.लक्ष्मण पोले यांनी दिनांक १२ मे, २०१५ रोजी शिक्षण उपसंचालक श्री.रामचंद्र जाधव यांना पत्राद्वारे वैयक्तिक मान्यता शिबीर घेण्यास परवानगी मागितली होती तथापि शिक्षण उपसंचालकांनी यास नकार देऊन संबंधित अर्ज फेटाळला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदरील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रलंबित प्रस्तावांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक ०४.११.२०१५ ते ०७.११.२०१५ या कालावधीत वैयक्तिक मान्यता शिबीर घेवून शासन नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटणबोरी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथे स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाची नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी मिळण्याबाबत**

**(५) २५२४३ (१६-०९-२०१५) श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटणबोरी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथे स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाची नवीन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.शालेय शिक्षण मंत्र्यांना दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शाळा सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) याबाबत निवेदन प्राप्त नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अतिरिक्त ठरविलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंधाबाबत गठीत केलेल्या समितीबाबत**

**(६) २६१३४ (१०-०८-२०१५) श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अतिरिक्त ठरविलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय दिनांक २३ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत दिनांक १२ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील ८२ प्राथमिक शिक्षकांना नियमबाह्य पध्दतीने अतिरिक्त ठरविलेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याबाबतचा अहवाल शासनास दिला आहे काय, असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांचा आकृतीबंध शासन निर्णय दि. २८-०१-२०१९ रोजी निर्गमित केला आहे. अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शाळांमधील शारीरीक शिक्षकांची पदे रद्दकरण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(७) ३६३१८ (२१-०१-२०१६) ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमधील इयत्ता सहावी ते आठवीसाठी असणाऱ्या शारीरीक शिक्षण शिक्षिकांची पदे रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णय रद्द करण्याची मागणी शारीरीक शिक्षण शिक्षक संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १९ आणि अधिनियमाचे परिशिष्ट अ प्रमाणे १०० पेक्षा जास्त उच्च प्राथमिक शाळेमध्ये कला शिक्षण, शारिरिक शिक्षण आणि कार्यानुभव या विषयाचे अध्यापन करण्यासाठी अंशकालीन निदेशक नियुक्त करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी धोरण ठरविणेबाबत शासनास दिलेल्या निदेशास अनुसरुन शासनाने शासन निर्णय दिनांक २१/०८/२०१४ निर्गमित केला होता. सदरचा शासन निर्णय अधिक्रमित करुन अंशकालिन निदेशकांऐवजी अतिथी निदेशकांचे पथक तयार करण्याबाबत दिनांक ०७.१०.२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला. तद्नंतर दिनांक ०७-०१-२०१७ ०१-०६-२०१७ व ०१-०९-२०१७, शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत दिनांक ०१-०९-२०१७ शासन निर्णय मा.उच्च न्यायालयात आव्हानित करण्यात आला आहे.

---

**बीड जिल्हा परिषदेअंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळांच्या इमारतीचे भाडे अनुदान थकीत असल्याबाबत**

**(८) ३९५९० (२७-१२-२०१६) श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा परिषद संचलित प्राथमिक शाळांचे भाडे सन २००८ पासून थकलेले आहे, थकीत रक्कम रु.९१ लक्षची मागणी शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे दिनांक ९ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षानुवर्षे इमारत भाडे न मिळाल्यामुळे इमारत मालकांनी शाळेला कुलूप लावण्याचा इशाराही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत विधान परिषद सदस्य यांनी शिक्षण संचालक, पुणे यांना दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) वेतनेतर अनुदानातून इमारत भाडे अदा करण्यात येत असून बीड जिल्हा परिषदेचे सन २०१०-२०११ पर्यंतची वसूलपात्र रक्कम रु.७८,०२,३५,५७२/- शासन खाती जमा केली नसल्याने वेतनेतर अनुदान देता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासन निर्णयातील शाळा संच मान्यता निकषाचा**
**व शैक्षणिक धोरणाचा फेरविचार करण्याबाबत**

**(९) ३९७६२ (१२-०५-२०१६) श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णयातील शाळा संच मान्यता निकषाचा व शैक्षणिक धोरणाचा फेरविचार करावा अशी मागणी शिक्षक भरतीचे जिल्हाध्यक्ष श्री.ध ना. पाटील यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शिक्षक भरतीचे जिल्हाध्यक्ष यांनी शासनाकडे केलेल्या मागण्याचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१), (२) व (३) सद्यस्थिती राज्यातील शाळांची संचमान्यता शासन निर्णय दि. २८-८-२०१५ च्या शासन निर्णयानुसार व तद्नुषंगाने सुधारित केलेल्या शासन निर्णय दि. ८ जानेवारी, २०१६ व दि.२ जुलै, २०१६ अन्वये केली जाते.

---

**सिंधुदूर्ग व कोल्हापुर जिल्हयातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समावेशाबाबत**

**(१०) ४२४४७ (२०-०६-२०१६) प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात पटसंख्येच्या निकषामुळे ७५५ शाळांमधील १ हजार ५०० शिक्षक व मुख्याध्यापकांची ४०० पदे अतिरिक्त ठरणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, कोल्हापुर जिल्हयातील माध्यमिक शाळेतील सुमारे ३३४ शिक्षक अतिरिक्त झाले असून सदर जिल्ह्यातील शिक्षक भरतीवरील बंदी उठवून सदर शिक्षकांची भरती करण्याची मागणी सातत्याने होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अतिरिक्त शिक्षक व मुख्याध्यापकांना इतर शाळांमध्ये सामावून घेण्याबाबत व प्रश्न भाग (२) मधील शिक्षक भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) तसेच राज्य शासनाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने प्राथमिक शिक्षण विभागातील विनंती व आपसी बदल्यास स्थगिती दिल्याने गत तीन वर्षापासून शिक्षकांच्या बदल्या झालेल्या नाहीत, हे ही  खरे आहे काय,
(५) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्राथमिक शाळांची २ हजार २० इतकी संख्या आहे या शाळामध्ये कार्यरत असणाऱ्या नऊ हजार शिक्षकांमध्ये १५१ शिक्षक अतिरिक्त ठरत असूनही जिल्ह्यामध्ये सुमारे १५० ठिकाणी शिक्षकांची रिक्त पदे आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा, गगनबावडा व शाहूवाडी येथे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांची नेमणूक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अतिदुर्गम भागातील शाळांमध्ये नियुक्ती करण्यात आलेली "कारभारी" शिक्षकांपैकी काही शिक्षक हजरच झालेले नाहीत त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४), (५), (६) व (७) दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ च्या आस्थापना सुचीनुसार माहे जानेवारी, २०१६ अखेर या जिल्हयात मुख्याध्यापकांची ४०५ पदे अतिरिक्त होती. तथापि त्यांचे अन्यत्र समायोजन न करता सदर मुख्याध्यापकांना त्यांच्या कार्यरत ठिकाणी ते सेवानिवृत्त होईपर्यन्त/पटसंख्येत वाढ होईपर्यन्त कायम ठेवण्याबाबत शासनाने आदेश दिले आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील माध्यमिक शाळेतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

पन्हाळा, गगनबावडा व शाहुवाडी या ठिकाणी समायोजनाने शिक्षक दिलेले आहेत.

ग्रामविकास विभागाच्या दि. १८-०५-२०१५ च्या आदेशान्वये केवळ आपसी व विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत.

रिक्त पदांवरील भरती ही पवित्र या प्रणालीद्वारे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

### शिक्षण अधिकाऱ्यांच्या दफ्तरी नोंद नसलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बनावट वैयक्तिक मान्यतेबाबत

**(११) ४२९९१ (२८-०६-२०१६) श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षण अधिकाऱ्यांच्या दफ्तरी नोंद नसलेल्या शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या ४१ बनावट वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा आदेश शिक्षण आयुक्तांनी पुणे येथे दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बनावट मान्यता मिळवून गैरव्यवहार करणारे अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षक एजंट यांचा शोध अद्याप शिक्षण विभागाला लागलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागाच्या वेतन पडताळणी विभागाकडे शिक्षक मान्यतेचे बनावट आदेश, शिक्के, छापलेल्या अक्षरांची रचना इ. वापरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता प्रकरणी झालेल्या अनियमिततेची चौकशी आयुक्त शिक्षण यांचे स्तरावर सुरु असून चौकशी अंती दोषी आढळणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाईचा प्रस्ताव आयुक्त शिक्षण यांचेकडून सादर करण्यात येत आहे.

---

### सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(१२) ४९०२५ (१२-०५-२०१६) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात पटसंख्येच्या निकषामुळे प्राथमिक शाळेत सुमारे दिड हजार पदे रिक्त ठरणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षक बेरोजगार होवू नये म्हणून उक्त शिक्षकांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हिंगोली जिल्हा परिषद शिक्षण विभागाने खासगी अनुदानित शाळांतील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावांना नियमबाह्य मंजूरी दिल्याबाबत

**(१३) ४९०८६ (२५-०५-२०१६) श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव मंजूर न करण्याचा निर्णय दिनांक २ मे, २०१२ पासून घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिनांक २ मे, २०१२ नंतर जिल्ह्यातील ३० खाजगी अनुदानित शाळांतील ७० शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतेच्या प्रस्तावांना मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्तप्रकरणातील वैयक्तिक मान्यता मंजूर झालेल्या प्रस्तावाबाबत शासनाची भुमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५६० (९)

**श्री. विनोद तावडे (२६-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे अशंत: खरे आहे.
(३) व (४) शिक्षण आयुक्तालय स्तरावरुन चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरातील खासगी शाळांसह जिल्हा परिषदेच्या शाळांतील अग्निशमन यंत्रणेत गॅस रिफीलिंग केले नसल्याबाबत**

**(१४) ५६८०७ (२२-०८-२०१९) श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील खासगी शाळांसह जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ६० टक्के शाळांतील अग्निशमन यंत्रणेत पाच वर्षापासून गॅस रिफीलिंग केले नसल्याने माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार अग्निशमन यंत्रणेत गॅस रिफीलिंग न करणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. काही शाळांमध्ये गॅस रिफिलिंग केले असून उर्वरित शाळांसंदर्भात शाळा व्यवस्थापन समिती मार्फत गॅस रिफिलिंग करणेबाबत संबंधित गट शिक्षण अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात राज्य शिक्षण बचाव कृती समिती व जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या नेतृत्वाखाली विविध प्रलंबित मागण्यासाठी काढलेला मोर्चा**

**(१५) ६९५९४ (२७-०१-२०१७) श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात राज्य शिक्षण बचाव कृती समिती व जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या नेतृत्वाखाली विविध प्रलंबित मागण्या व अशैक्षणिक निर्णयाविरोधात माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संघटनेच्या प्रलंबित मागण्यांचे स्वरुप काय आहे, व याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामिण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शारिरीक शिक्षणाचे विषय वेळेवर व नियमित घेण्याबाबत**

**(१६) ७२९६६ (२७-०१-२०१७) श्री. राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यार्थ्यांमध्ये खेळाडू वृत्ती निर्माण होऊन उत्कृष्ट खेळाडू तयार होण्यासाठी प्रत्येक खाजगी शाळेत शारिरीक शिक्षकांची नियुक्ती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील सर्वच शाळांमध्ये शारिरीक शिक्षण हा विषय फक्त वेळापत्रकापुरताच मर्यादीत असून या विषयाच्या तासिकेला शिक्षक वेगळ्या विषयाचे तास घेताना किंवा वर्ग रिकामा राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने प्रत्येक शाळेतील शारिरीक शिक्षणावर भर देऊन हा विषय वेळेवर व नियमित घेण्यात यावा, याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १०० पेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये अंशकालिन निदेशक/ अतिथी निदेशक नेमण्याची तरतूद बालकांचा मोफत व सक्तीचा अधिकार अधिनियम २००९ मध्ये आहे. त्यानुसार शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येते. खाजगी शाळांबाबत शासन निर्णय दिनांक २८/०८/२०१५ नुसार कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील शाळांमध्ये इंग्रजी व मराठी माध्यमांच्या शाळांना एकच मुख्याध्यापकाची नेमणूक होत असल्याबाबत**

**(१७) ८६२५० (२३-०८-२०१७) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील अनेक शाळांमध्ये इंग्रजी व मराठी माध्यमाचे वर्ग चालविण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही माध्यमांच्या शाळात एकाच मुख्याध्यापकांची नेमणूक करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेगवेगळया माध्यमांसाठी वेगळया मुख्याध्यापकांची नेमणूक करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित करुनही त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९)** (१) हे खरे आहे.
(२) हे ही खरे आहे.
(३) एकाच शाळेत बहुमाध्यमाचे वर्ग व एकाच युडायस नंबर असल्यास एकच मुख्याध्यापक अनुज्ञेय आहे.

तथापि माध्यमनिहाय शाळा वेगवेगळया असतील तर प्रत्येक शाळेला मुख्याध्यापक पद शासन निर्णयानुसार अनुज्ञेय ठरते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मराठी माध्यम असलेल्या शाळांची व मराठी भाषेची वाढती अधोगती व बंद पडत चाललेल्या मराठी शाळांबाबत**

**(१८) ८७८१८ (२३-०८-२०१७) श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मराठी माध्यम असलेल्या शाळांची व मराठी भाषेची दिवसेंदिवस वाढती अधोगती व एकामागून एक बंद पडत चाललेल्या मराठी शाळा यामुळे राज्यातील मराठी शाळांची सद्यःस्थिती मांडणारी श्वेतपत्रिका शासनाने काढावी अशी मागणी राज्यतील उपसमन्वय समिती, महामुंबई शिक्षण संस्था संघटना आणि मराठी अभ्यासकेंद्र यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००० सालानंतर राज्यात किती मराठी शाळा बंद पडल्या आहेत, त्या पुर्नजिवित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१९) :** (१) असे निवेदन प्राप्त नाही. मराठी माध्यमाच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी राज्यात प्रगत शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व अन्य शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(२) सन २००० नंतर राज्यातील मराठी शाळांची संख्या कमी झाली असून याअनुषंगाने मराठी माध्यमाच्या शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व अन्य शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्राथमिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असल्याबाबत**

**(१९) ८८४०१ (२३-०८-२०१७) श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३६ जिल्हयातील प्राथमिक शिक्षण (१ ली ते ८ वी) घेणा-या विद्यार्थ्यांची गत ५ वर्षात २ कोटी ४० लाख संख्या घटून तीन वर्षात २ हजार ९१२ शिक्षकांची संख्या वाढली असल्याचे सन २०१२ ते २०१७ या काळात यू-डायस (जिल्हा शैक्षणिक माहती प्रणाली) अहवाला वरून दिनांक ४ मे, २०१७ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील प्राथमिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने घट होत असल्याने शिक्षक अतिरिक्त ठरु नयेत यासाठी शिक्षकांचे समायोजन करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री.अनिल गलगली यांनी मा.मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री तसेच शालेय शिक्षण सचिव व शिक्षण आयुक्त यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पत्राव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिक्षक समायोजनेची प्रक्रिया तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांची तफावत दुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील शाळांतील सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वर्षातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची करण्याची कार्यवाही जवळजवळ पूर्ण झाली असून सन २०१७-१८ या वर्षातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनुसार ज्या शाळांतील विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाल्यामुळे पद कमी झाले असेल, अशा शाळांतील पद अतिरिक्त शिक्षकासह ज्या शाळेमध्ये विद्यार्थी पटसंख्या वाढली आहे, अशा शाळांमध्ये समायोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

### राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळा व शिशु संस्कार केंद्रे पूर्वलक्षी प्रभावाने आणि पर्याप्तनिधी मंजुरीसह कार्यान्वित करण्याची मागणीबाबत

**(२०) ९००४९ (२३-०८-२०१७) श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषकरून मुंबई शिक्षण परिषदेने शिफारस केलेल्या आणि नांदी फौंडेशन या सामाजिक संस्थेने अंगीकृत केलेल्या महानगरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळा व शिशु संस्कार केंद्रे पूर्वलक्षी प्रभावाने आणि पर्याप्तनिधी मंजुरीसह मुंबईतील परिक्षेत्रात तातडीने कार्यान्वित करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी, जनप्रतिनिधी, शिक्षणप्रेमी, विद्यार्थी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (शालेय शिक्षण), मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), मुख्य-सचिव तसेच संबंधित विभागाचे प्राधान सचिव तथा शिक्षण संचालक आणि त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१९) :** (१) याबाबतचे निवेदन प्राप्त नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचा दाखल्याकरिता सबळ कारण लेखी स्वरुपात देण्याचे बंधन घातल्याबाबत**

**(२१) ९०४७२ (२३-०८-२०१७) श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकरावी प्रवेश प्रकियेत अनेक विद्यार्थी ऑनलाईन रजिस्ट्रेशन न करता इतर ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी शाळेतून दाखला घेऊन जातात आणि हवा त्या ठिकाणी प्रवेश न मिळाल्यास पुन्हा रजिस्ट्रेशनसाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयात गोंधळ घालतात, हे टाळण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना शाळा सोडण्याचा दाखला हवा असल्यास सबळ कारण लेखी स्वरुपात देण्याचे बंधन घातले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या रजिस्ट्रेशनबाबतच्या कार्यवाहीस चुकारपणा झाल्यास शाळेच्या मुख्याध्यापकाला जबाबदार धरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या शासन निर्णयाची अंमलबजावणी कोणत्या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे व या निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोपालेश्वर (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) शिक्षण संस्थेच्या जाखले हायस्कूलमध्ये निलंबित शिक्षकाला मुख्याध्यापक पदाचा प्रभारी पदभार दिल्याबाबत**

**(२२) ९१७९० (२३-०८-२०१७) श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोपालेश्वर (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) शिक्षण संस्थेच्या जाखले हायस्कूलमधे सेवा निवृत्तीने मुख्याध्यापक पद रिक्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त झालेल्या पदावर योग्य व्यक्तीची निवड होणे गरजेचे असूनही संबंधित माध्यमिक शिक्षण अधिकारी यांनी संगणक अपहार प्रकरणी असलेल्या व चौकशी समिती मार्फत आरोपपत्र बजावलेल्या सहायक शिक्षकास अवैधरित्या प्रभारी मुख्याध्यापक पदाचा पदभार दिला असून सदर चौकशी अजूनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त अवैधरित्या देण्यात आलेल्या पदभाराप्रकरणामुळे अनेक पालकांच्या तक्रारी आल्या असून पालक व शिक्षण संस्थेच्या प्रश्नात वाद निर्माण होत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार सदरचा पदभार रद्द करून अन्य शिक्षकाला पदभार देणेबाबत तसेच अशा नियमबाह्य नियुक्त्या देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९)** (१) होय हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार सेवाज्येष्ठता विचारात घेवून शिक्षणाधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे.
(३) अशा प्रकारच्या तक्रारी शिक्षण अधिकारी कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) नियुक्तीचे प्राधिकार कार्यकारणीस आहेत. योग्य शिक्षकास प्रभारी मुख्याध्यापक म्हणून मुख्याध्यापक स्वाक्षरी करण्यास मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी (जिल्हा सिंधुदुर्ग) तालुक्यातील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा यांनी मार्कजी जमात, मुंबई या संस्थाच्या सहा खोल्या भाडे तत्वावर घेतल्याबाबत.

**(२३) ९३५२७ (२३-०८-२०१७) श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जिल्हा सिंधुदुर्ग) तालुक्यातील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा यांनी सावंतवाडी मार्कजी जमात, मुंबई या संस्थाच्या सहा खोल्या भाडे तत्वावर घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२ पासून सदर सहा खोलींचे भाडे जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा यांनी संस्थेला दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त संस्थेचे थकीत भाडे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) सावंतवाडी तालुक्यातील जिल्हा परिषद उर्दू शाळेसाठी मर्कजी जमात संस्थेकडून पाच वर्गखोल्या भाडेतत्वावर घेण्यात आल्या होत्या.

(२) (३) व (४) मे, २०१२ पासून सदर वर्गखोल्यांचे भाडे प्रलंबित असून याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

---

**उस्मानशाही मिल (जि.नांदेड) शाळेची इमारत जीर्ण झाल्याने शाळा बंद करण्याबाबत**

**(२४) ९४४९१ (२३-०८-२०१७) श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानशाही मिल (जि.नांदेड) या सन १९२८ साली सुरु झालेल्या व सन १९८१ पासून अनुदान प्राप्त असलेल्या शाळेत ३७६ विद्यार्थी शिक्षण घेत असून शाळेची इमारत जीर्ण झाल्याचे कारण देत एन.टी.सी. मॅनेजर यांनी ही शाळा बंद करण्यासाठी जिल्हा परिषद, नांदेड व संबधित कार्यालयास दिनांक २६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची शाळा बंद केल्यास ३७६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून तेथील शिक्षकही बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदरची शाळा बंद न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

शाळा बंद करण्याबाबत एन.टी.सी. मॅनेजर यांनी पत्र दिले आहे.

(२), (३) व (४) सदर शाळा बंद करण्यात येऊ नये, अशी विनंती शाळेच्या मुख्याध्यापकांनी केली आहे. त्याअनुषंगाने तपासणी करून पुढील कार्यवाही सुरू आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत**

**(२५) ९९२०७ (२९-१२-२०१७) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी)** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक ३ डिसेंबर, २०१२ च्या अधिसूचनेनुसार अनाधिकृत शाळेवर कारवाई करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सक्षम प्राधिकाऱ्यांना तसेच शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांना अनाधिकृत शाळेवर तत्काळ कारवाई करण्याचे निदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या निदेशाच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील एकूण किती व कोणत्या अनाधिकृत शाळांवर कारवाई करण्यात आली आहे तसेच सदर अनाधिकृत शाळेत प्रवेश घेतलेल्या किती विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात आले आहे, वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१९)** (१) व (२) ज्या शाळांनी आरटीई मान्यता घेतलेली नाही, अशा अनधिकृत शाळांना बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८(२) नुसार कारणे दाखवा नोटीस देण्याबाबतच्या सुचना दि. ३.१२.२०१२ रोजीच्या अधिसुचनेन्वये क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) यासंदर्भात क्षेत्रिय स्तरावरून कार्यवाही करण्यात येत नाही.

---

**नांदेड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी व उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) अन्य अधिका-यांनी खाजगी शाळांच्या वेतनेत्त्तर अनुदानाच्या रक्कमेत केलेला गैरव्यवहार**

**(२६) ९९३२६ (२९-१२-२०१७) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.संदिपकुमार सोनटक्के यांनी शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन स्वतःचे नातेवाईक श्री.राजमाने आनंद विमलनाथराव यांस १०० टक्के अनुदानावर बनावट अभिलेखे तयार करुन प्राथमिक शिक्षक म्हणून मान्यता देऊन तसेच उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री.शिवाजी खुडे व अन्य अधिका-यांनी खाजगी शाळांच्या वेतनेत्त्तर अनुदानाच्या रक्कमेत गैरव्यवहार करुन शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी श्री.परमेश्वर गोणारे विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, पुणे यांनी दिनांक २३ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास केलेल्या तक्रारीवरुन विभागीय शिक्षण संचालक, लातूर विभाग, लातूर यांनी केलेला चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही केली जात आहे.

---

**राज्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) १०५०७७ (०६-०४-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या ७१७८३ स्वयंपाकगृहापैकी उर्वरित १३९५२ स्वयंपाकगृहांची सुरु असलेली बांधकामे पूर्ण झाली आहेत काय,

(२) तसेच, उक्त शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एकूण किती स्वयंपाकगृहांना गॅस कनेक्शन देण्यात आली आहेत वा येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या एकूण ७१,७८३, स्वयंपाकगृहांपैकी ५७,९९२ स्वयंपाकगृह बांधून पूर्ण झाली असून उर्वरित १३,७९१ स्वयंपाकगृहांपैकी ६३४ स्वयंपाकगृह बांधकामे प्रगतीपथावर आहेत.

(२) व (३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजविण्यासाठी शाळांमध्ये गॅस कनेक्शन उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश क्षेत्रिय यंत्रणांना देण्यात आले आहेत. यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**स्वयंअर्थसहाय्यित विधेयकाचा फेरविचार करुन विधेयक मागे घेण्याबाबत**

**(२८) १०५१३५ (०६-०४-२०१८) श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने खासगी कंपन्यांना, शाळा सुरु करण्याची परवानगी देणारे हिवाळी अधिवेशनात संमत केलेले विधेयक रद्द करण्याची मागणी शिक्षकांनी सोमय्या कॉलेजचे डॉ.नरेंद्र पाठक यांच्या अध्यक्षतेखाली, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षणमत्री यांची भेट घेऊन केली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, पालघर जिल्ह्यात शासनाच्या शिक्षण विषयक धोरणाविरोधात माध्यमिक शिक्षण व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षणाधिकारी कार्यालयावर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शने केली होती, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, राज्यातील अनेक शासकीय शाळा बंद करुन नवीन शाळा सुरु करण्यासाठी कॉपोरेट कंपन्यांना मान्यता देण्याचा निर्णय म्हणजे शिक्षणाच्या खासगीकरणाचा घाट घातला जात असल्याची टिका शिक्षणक्षेत्रातून व्यक्त होत असून शाळाप्रवेशासाठी गुणवत्तेपेक्षा पैसा हा घटक महत्वाचा ठरणार असून गोरगरीब, वंचितांची मुले शिक्षणापासून वंचित राहणारअसून, शासनाच्या या निर्णयामुळे शासकीय व अनुदानीत शाळा ओस पडतील अशी भितीही शिक्षणतज्ञ व्यक्ती करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार स्वयंअर्थसहाय्यित निर्णयाचा फेरविचार करुन निर्णय मागे घेण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१९) :** (१) व (२) खाजगी कंपन्यांना शाळा सुरू करण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्राथमिक शाळेतून माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक अथवा माध्यमिकमधून उच्च माध्यमिक अशा वेगळया पदावर नियुक्ती व सैनिक शाळेतून सैनिक शाळेमध्ये नव्याने नियुक्ती झालेल्या शिक्षकांना वेतन संरक्षण देण्याबाबत**

**(२९) १०५२३२ (०६-०४-२०१८) श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०११ च्या निर्णयान्वये नियमित शिक्षकांची प्राथमिक शाळेतून प्राथमिक शाळेत, माध्यमिक शाळेमधून माध्यमिक शाळेत, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये अध्यापक विद्यालयातून अध्यापक विद्यालयात व सैनिक शाळेतून सैनिक शाळेमध्ये नव्याने नियुक्ती झाल्यास त्यांचा वेतनास संरक्षण राहील, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शाळेतून माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक अथवा माध्यमिकमधून उच्च माध्यमिक अशा वेगळया पदावर नियुक्ती झाल्यास वेतन संरक्षण रहाणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार शिक्षकांना वेतन संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०२-२०१९) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल होत असलेल्या तक्रारींवर त्वरीत कारवाई करण्याबाबत**

**(३०) १०५२५२ (११-०४-२०१८) ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द करण्यात आलेल्या माहितीवरून सन २००८ ते २०१७ अखेरपर्यंत फक्त १ हजार ८३६ आरोपींनाच शिक्षा झाली असून सुमारे ६ हजार ४५२ जण निर्दोष सुटले असल्याचे सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल झालेल्या विविध प्रकरणांपैकी सुमारे २०० प्रकरणांची चौकशी गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असून फक्त २५ प्रकरणांत दोषींना शिक्षा झाली असल्याचे माहितीच्या अधिकारात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याचबरोबर यावर्षी २४८४ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी फक्त ४३ प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले असून उर्वरित २४४१ प्रकरणे बंद करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ‘अ’ वर्ग अधिका-यांपासून चतुर्थश्रेणी कर्मचा-यापर्यंत अनेक सरकारी कर्मचारी तसेच लोकसेवक हे लाच घेताना ‘एसीबी’ च्या जाळ्यात अडकतात मात्र शिक्षा होण्याचे प्रमाण खूपच कमी असल्याने या लाचखोरीवर नियंत्रण करण्यात अपयश आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आरोपींना कडक शिक्षा झाल्याशिवाय या लाचप्रकरणाला प्रतिबंध बसणार नसल्याने सरकारी पातळीवर भ्रष्टाचाराला प्रतिबंध करण्यासाठी तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दाखल होत असलेल्या तक्रारींची संख्या लक्षात घेता दोषींवर त्वरित कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०१९) :** (१) सन २००८ ते २०१७ या कालावधीत एकुण १०५९ आरोपीतांना शिक्षा झाली असुन ४२९६ आरोपी निर्दोष सुटले आहेत.

(२) व (३) होय,

(४) गेल्या ४ वर्षात वर्ग निहाय शिक्षा झालेल्या आरोपीतांची संख्या

| वर्ष | वर्ग १ | वर्ग २ | वर्ग ३ | वर्ग ४ | इलोसे | खा. इसम | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | ६ | १२ | ५३ | ३ | ८ | ३ | ९२ |
| २०१५ | ७ | १३ | १०३ | ६ | २ | ५ | १३६ |
| २०१६ | ७ | ३ | ७३ | ६ | ५ | ४ | ९८ |
| २०१७ | ६ | ७ | ४० | ३ | ५ | ६ | ६७ |
| **एकुण** | २६ | ३५ | २६९ | १८ | १९ | २६ | ३९३ |

(५) व (६) लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मोबाईल ॲप, टोल फ्री.क्रं. १०६४, ही हेल्पलाईन, ९९३०९९७७०० हा What Sapp नंबर तसेच Facebook page प्रसिध्दकरून जन जागृती करण्यात येते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेतस्थळावरून सामान्य जनतेसाठी सर्व माहिती उपलब्ध केली जात आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय कार्यालयात जावून भेटी देवून माहिती देत असतात व त्यांच्या कार्यक्षेत्रातील आठवडे बाजार, एसटी स्टॅण्ड, रेल्वेस्टेशन, कॉलेज इत्यादी ठिकाणी जाऊन सुध्दा जनजागृती करत असतात. तसेच शासकिय कार्यालयाच्या दर्शनी भागावर लाचलुचपत प्रतिबंधंक विभागाबाबत माहिती प्रसिध्द केली जाते. याशिवाय भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मध्ये दिनांक २६-०७-२०१८ रोजी सुधारणा करण्यात आली असून यातील तरतूदींनुसार भ्रष्टाचाराच्या न्यायालयिन प्रकरणांचा दोन वर्षात निपटारा करण्याची तरतूद केली आहे. दोन वर्षात सदर केसचा निपटारा न झाल्यास मा. न्यायालयाकडून वाढीव दोन वर्षाची मुदतवाढ घेवून प्रकरण निकाली काढने आवश्यक आहे. त्यामुळे मा. न्यायालयात अश्या केसेस प्रलंबित राहणार नाही.

---

### अहमदनगर जिल्हयातील कुकडी पाण्याचे पुनर्वाटप करण्याचा घेतलेला निर्णय

**(३१) १०७१८६ (२८-०३-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर हा कृषी प्रधान जिल्हा असून सदर जिल्हयात सातत्याने दुष्काळी परिस्थिती असल्याने कुकडी पाण्याचे पुनर्वाटप करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०४-२०१९) :** (१) होय.

(२) कुकडी प्रकल्पाच्या सिंचनासाठी सुधारीत पाणी वापराच्या प्रस्तावास शासन पत्र दि.२२३.२०१८ अन्वये काही अटींच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच कुकडी पाटबंधारे प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि.२.११.१८ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. त्यामध्ये जलनियोजनास देखील मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(३२) १११२८७ (१२-०४-२०१८) श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४ ते २०१६ या कालावधीत ३७७१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या असून विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक असल्याचे एका पहाणीत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विद्यार्थ्यांच्या होणा-या आत्महत्यास प्रतिबंधीत करण्यासाठी शासनामार्फत कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांना समुपदेशनाच्या हेतुने शिक्षकांना विशेष प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यांवर परिक्षांचा ताण येऊ नये याकरिता राज्यमंडळातर्फे समुपदेशनाची व्यवस्था करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील**
**असंख्य प्रकरणात होत असलेल्या अनियमिततेबाबत**

**(३३) ११२१८९ (०६-०४-२०१८) श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या माध्यमिक व प्राथमिक शिक्षण विभागातील अनेक प्रकरणात दिलेल्या मंजुरी मध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजी वा सुमारास स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागातील कोण-कोणत्या प्रकरणामध्ये कोणत्या वर्षात अनियमितता आढळून आलेली आहे,
(३) असल्यास, उक्त अनियमितता प्रकरणी शासन समिती नेमून चौकशी करणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
प्राथमिक शिक्षण विभागास कोणत्याही प्रकरणात स्थगिती आदेश प्राप्त झालेले नाहीत.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात पाली भाषा विद्यापीठ व पालीभाषा अकादमीस्थापन करण्याबाबत

**(३४) ११२२८२ (१४-०४-२०१८) श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री .हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पाली भाषा व संस्कृतीचे जतनसंवर्धन व संशोधन करण्यासाठी स्वतंत्र पाली विद्यापीठाची स्थापना तसेच पाली भाषा अकादमी स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास,निर्णयाची अंमल बजावणी कॆंव्हापासून करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यातील विविध अकृषी विद्यापीठांमध्ये असलेल्या पाली विषयाची तसेच शिक्षक व विद्यार्थी संख्या याबाबतची माहिती सर्व विद्यापीठाकडून मागविण्यात येऊन सद्य:स्थितीत

संबंधीत विद्यापीठामध्ये पाली भाषा अभ्यासक्रमास पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. तसेच, पाली विद्यापीठाची स्थापना करावयाची झाल्यास या विद्यापीठासाठी जमीन, इमारत, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादींचा खर्च मोठया प्रमाणात वाढविण्याची शक्यता असल्याने त्या-त्या विद्यापीठाने पाली भाषेसाठी उपलब्ध होणारे विद्यार्थी त्यातून निर्माण होणारा रोजगार प्राध्यापक,कर्मचारी यांचेसाठी लागणारा खर्च इत्यादी बाबींचा विचार करुन पाली भाषा विषय त्यांचे बृहत आराखडयात समाविष्ट करुन निर्णय घेण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिंगणापूर (जि.कोल्हापूर) येथील शाळेत शालेय पोषण आहाराच्या तांदळातील अपहारप्रकरणी पुरवठादार एम.पी. भूतडा यांच्यावर कारवाई करण्याबाबत**

**(३५) ११४२७० (०६-०४-२०१८) डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिंगणापूर (जि.कोल्हापूर) येथील शाळेत शालेय पोषण आहाराच्या तांदळातील अपहारप्रकरणी पुरवठादार एम.पी. भूतडा यांच्यावर कारवाई करण्याबाबतचा अहवाल संचालक, पुणे यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानूसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली असून संबंधित पुरवठेदाराविरुध्द प्रमाणित व मुद्राकिंत वजन काटा न वापरल्यामुळे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खासगी मान्यताप्राप्त अनुदानित प्राथमिक शाळांचे लेखा परीक्षण झाले नसल्याबाबत**

**(३६) ११५७५३ (०६-०४-२०१८) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खासगी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांना इमारत भाडे देण्याची तरतूद प्राथमिक शिक्षण नियमावली असून गेले अनेक वर्षापासून दरवर्षी अनुदान देण्यात येते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिलेले अनुदान त्याच कामासाठी वापरले गेले किंवा कसे याबाबत आजपर्यंत लेखापरीक्षण झाले नसल्याचे निदर्शनास आल्याने वेतन पथकाला संबंधित शाळांचे मान्यता मिळाल्यापासूनचे २० प्रकारचे रेकॉर्ड तपासण्याचे आदेश शासनाने दिले आहेत, हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, वेतन पथकाला दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने आत्तापर्यंत किती शाळांचे लेखा परीक्षण करण्यात आले आहे तसेच संपूर्ण शाळांचे लेखापरीक्षण पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) खाजगी अनुदानित शाळांना प्रतिवर्षी इमारत भाडेसाठी १% वेतनेत्तर अनुदान देण्याबाबत आदेश आहेत.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे आकृतिबंध मंजूर नसल्याने
गत अनेक वर्षे भरती बंद असल्याबाबत**

**(३७) ११८७६० (२०-०७-२०१८) श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे आकृतिबंध मंजूर नसल्याने शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती गत अनेक वर्षे बंद असल्याने शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी वारंवार आंदोलने केली आहेत व करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर आकृतिबंध मंजूर करुन शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०२-०२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकरिता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित आकृतीबंधाचा शासन निर्णय दिनांक २८/०१/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

---

## राज्यातील मुल्यांकन पात्र उच्च माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबत

**(३८) १२६४८६ (०४-१२-२०१८) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुल्यांकन पात्र उच्च माध्यमिक शाळांची अनुदान पात्र यादी निधीसह घोषित करुन वेतन सुरु करावे या प्रमुख मागणीसाठी विना अनुदानित उच्च माध्यमिक विनावेतन अध्यापनाचे काम करणाऱ्या शिक्षकांनी शाळा बंद करुन माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान आझाद मैदानावर आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनुदानासाठी १५०० उच्च माध्यमिक शाळा पात्र असताना केवळ १४६ विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळा अपूर्ण पध्दतीने घोषित करण्यात आल्या, हेही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे येथील आयुक्त शिक्षण स्तरावर मुल्यांकन पात्र शाळांची यादी तयार असतानाही प्रसिध्द करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंदोलन करणाऱ्यां शिक्षकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४)उच्च माध्यमिक शाळा व तुकडयांची अनुदानास पात्रची यादी घोषित करावी ही व अन्य मागण्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंब्रा कौसा (जि.ठाणे) येथील हबिब एज्युकेशनल वेलफेअर सोसायटी मार्फत चालविण्यात येणाऱ्या एम.एस.लॉ कॉलेजच्या प्रशासनाने अवाजवी शुल्क घेतल्याबाबत

**(३९) १२६७७५ (०४-१२-२०१८) श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंब्रा कौसा (जि.ठाणे) येथील हबिब एज्युकेशनल वेलफेअर सोसायटी मार्फत चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदानीत एम.एस.लॉ कॉलेजच्या प्रशासनाने ५ वर्षाकरीता "लॉ कोर्स" साठी शुल्क नियामक प्राधिकरणाचा नियम डावलून प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु. ५६८०/- व ३ वर्षाच्या

कोर्ससाठी ७४५०/- रुपये जादा घेतल्याबाबतची तक्रार एम.एस.कॉलेज ऑफ लॉ च्या माजी विद्यार्थ्याने व स्टुडंट लॉ कौन्सीलच्या अध्यक्षांनी दिनांक ३१ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्या सुमारास मुंबई विद्यापीठ व शुल्क नियामक प्राधिकरणाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठ व शुल्क नियामक प्राधिकरणारे एस.एस.लॉ कॉलेज प्रशासनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, या संदभार्त शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२१-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या विद्यार्थी तक्रार निवारण समितीने, विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेले अतिरिक्त शुल्क महाविद्यालयाने संबंधित विद्यार्थ्यांना परत करावे, असा ठराव परीत केला. सदर ठरावानुसार महाविद्यालयाने कार्यवाही केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हा शिक्षण संस्था संचालक संघ व नागपूर महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळ यांच्या मागण्यांबाबत

**(४०) १२६९२५ (१९-११-२०१८) श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण संस्थांच्या मागण्यांबाबत निवेदन चंद्रपूर जिल्हा शिक्षण संस्था संचालक संघ चंद्रपूर तसेच नागपूर विभाग महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळ यानी दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ रोजी तसेच खासगी व स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबीत मागण्यांबाबतचे निवेदन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, जिल्हा चंद्रपूर यांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व या मागण्यांवर निर्णय केंव्हापर्यंत घेण्यात येईल ?

**श्री. विनोद तावडे (२०-११-२०१८) :** (१) चंद्रपूर जिल्हा शिक्षण संस्था संचालक संघ, चंद्रपूर यांचे दिनांक २९.१०.२०१८ चे व महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळ, नागपूर विभाग यांचे दिनांक २६.१०.२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) सदर निवेदनांतील विविध मागण्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### अचलपूर येथील क्रीडा सुविधा प्रस्तावांचे अनुदान मंजूर करण्याबाबत

**(४१) १२८०६५ (०४-१२-२०१८) श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदारसंघातील क्रीडा सुविधा निर्मिती योजनेअंतर्गत प्रस्तावांचे अनुदान मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.क्रीडा मंत्री यांना दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी लेखी पत्र लिहून विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीनी त्यांच्या मतदारसंघातील कोणते प्रस्ताव आणि ती अनुदानाची मागणी केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाना मा.सहाय्यक संचालक क्रीडा व युवकसेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली आहे काय तसेच मा.मंत्री क्रीडा यांनी दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी उक्त प्रस्तावाच्या मागणी पत्रावर “मान्य” असा शेरा देवून स्वाक्षरी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त प्रस्तावाना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच या प्रस्तावना किती रक्कमेचे अनुदान किती कालवधीत उपलब्ध करून देणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अचलपूर मतदार संघातील १. वीर बाजीप्रभु क्रीडा व व्यायाम मंडळ, बेलोरा, ता.चांदुरबाजार, जि.अमरावती, २. सत्यशोधक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, टोंगलापूर फाटा मासोद, ता.चांदुरबाजार, जि.अमरावती, ३. ग्रामपंचायत, चमक खुर्द, ता.चांदुरबाजार, जि.अमरावती या संस्थांना बंदिस्ति प्रेक्षागृहाचे बांधकाम करण्यासाठी अनुक्रमे रु.९०.०० लक्ष, रु.९०.०० लक्ष व रु.३०.०० लक्ष अनुदान मंजूर करण्याची विनंती केली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावाबाबत उचित निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नॅक मुल्यांकन प्राप्त महाविद्यालयांना आर्थिक लाभ देण्याबाबत**

**(४२) १२९०४१ (०४-१२-२०१८) श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४३७४ महाविद्यालयां पैकी १२५३ महाविद्यालयांकडे राष्ट्रीय मुल्यांकन आणि मुल्यामापन परिषदेचा (नॅक) दर्जा असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅक मुल्यांकन घेतलेल्या महाविद्यालयांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक लाभ मिळत नसल्याने महाविद्यालये उदासीन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुल्यांकन परिषदेने दिनांक १ एप्रिल २०१७ रोजी वा त्या सुमारास नवे निकष आणून नॅक मुल्यांकन करणे अधिक कठीण केले असल्याने ग्रामीण भागातील महाविद्यालयांना यातील काही निकष पूर्ण करणे अशक्य आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठ कायद्यातील तरतूदीमुळे महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना येत्या काळात नॅक मुल्यांकन करुन न घेणे अनिवार्य ठरणार आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नॅक मुल्यांकन प्राप्त झालेल्या महाविद्यालयांना आर्थिक लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नॅक परिषदेने निकष आणि अर्ज करण्याच्या प्रक्रीयेमध्ये सुधारणा केली असून त्यामध्ये निकषांच्या निवडीचे पर्याय उपलब्ध आहेत.

(४) हे खरे नाही.

विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठ कायद्यातील तरतूदीमुळे महाविद्यालयांना आणि विद्यापीठांना येत्या काळात नॅक मुल्यांकन करुन घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नॅक मुल्यांकन प्राप्त व विशिष्ट निकषांची पुर्तता करणा-या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोग तसेच रुसा अंतर्गत निधी मंजूर करण्यात येतो.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील शेक्षणिक संस्थांना अनुदान देण्याबाबत**

**(४३) १२९३६३ (०४-१२-२०१८) श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कायम विनाअनुदानीत संस्थेतील कायम शब्द वगळुन काही संस्थांना अनुदान दिले असल्याचे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हयातून अनुदानासाठी एकुण अंदाजे १८० प्रस्ताव सादर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संपुर्ण महाराष्ट्रातील जिल्हामधील काही संस्थांना अनुदान दिले असून नागपूर जिल्हयातील एकाही संस्थेला अनुदान देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार नागपूर जिल्हयातील उर्वरीत संस्थांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कासय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) शाळांच्या मान्यता आदेशातील कायम शब्द वगळला असून अनूदानास पात्र घोषित केलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना अनूदान मंजूर केले आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विद्यार्थ्यांची प्रगती चाचणी घेण्यास शिक्षण विभागास विलंब होत असल्याबाबत**

**(४४) १३०७९९ (०४-१२-२०१८) श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांची प्रगती तपासण्यासाठी शिक्षण विभागाकहून घेण्यात येणा-या प्रगती चाचण्यास उशीर झाल्यामुळे या चाचण्यांचे वर्षभराचे वेळापत्रक बिघडण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास त्यामधील पहिली चाचणी म्हणजेच पायाभूत चाचणी ही आधीच्या वर्षाच्या अभ्यासक्रमावर असते दुसरी ते आठवीसाठी घेण्यात येणारी पायाभूत चाचणी दिनांक २८ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत घेण्यात आली मात्र मूळ निर्णयानुसार ही चाचणी जुलै मध्ये होणे अपेक्षित असतानाही उशीरा घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार अध्ययन निष्पत्ती आधारीत चाचणी निर्मिती व अनुषंगिक प्रक्रिया यासाठी जादा कालावधी लागला.

---

**राज्यातील शिक्षक चौकशी समितीचे सदस्य श्री.रमाकांत पांडे यांची चौकशी करण्याबाबत**

**(४५) १३१४०७ (०५-१२-२०१८) श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक चौकशी समितीचे सदस्य श्री.रमाकांत पांडे यांची चौकशी करण्याचे आदेश राज्यपालांनी शिक्षण विभागाला दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाचे पालन शिक्षण विभागाने केले नसल्याचा आरोप विविध शिक्षक संघटनांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.रमाकांत पांडे यांच्यावर कारवाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा शिक्षक संघटनांनी दिला असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१९) :** (१), (२) व (३) होय हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी चौकशी सुरु आहे.

---

**राज्यातील २० टक्के अनूदान प्राप्त शाळांना अनुदानाची तरतुद करण्याबाबत**

**(४६) १३१५२७ (०५-१२-२०१८) श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १६२८ शाळा व २४५२ वर्ग तुकडयांना प्रचलीत नियमानुसार तसेच प्रत्यक्षदर्शी या सर्व शाळा ६० टक्के अनुदानास पात्र असतांना त्यांना दिनांक ०६ सप्टेंबर, २०१६ पासून केवळ २० टक्के अनुदान दिल्याने उर्वरीत अनुदान देण्याचे पावसाळी अधिवेशन २०१८ मध्ये घोषणा करण्यात येईल असे आश्वासन सहयाद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत मा. शिक्षण मंत्री यांनी शिक्षण सचिव यांच्यासमवेत दिले असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळी अधिवेशन संपल्यानंतरही आश्वसनाची पुर्तता न केल्याने आश्वासनाची पुर्तता करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०२-२०१९) :** (१) सदर शाळा व तुकडयांना पुढील अनुदान देण्याबाबत मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांनी दिनांक २८/११/२०१८ रोजी सभागृहात निवेदन केले आहे.

(२) या बाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चोपडा (जि.जळगांव) येथे तालुका क्रीडा संकुल बांधण्याबाबत**

**(४७) १३३२८५ (०४-१२-२०१८) श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी शासनाकडून १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीपैकी २३.६६ लक्ष रुपयांचा निधी आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांनी दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चोपडा तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याकरिता व उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. क्रीडामंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे तसेच सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२३-०१-२०१९) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) चोपडा तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम लवकर पूर्ण करण्याकरिता उर्वरित निधी मागणीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून निधी वितरण करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर आणि वाशिम येथे नवीन मॉडेल कॉलेज सुरु करण्याबाबत**

**(४८) १३३३७९ (०४-१२-२०१८) श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने रुसा अंतर्गत राज्यात पालघर आणि वाशिम येथे दोन नवीन मॉडेल कॉलेज सुरु करण्याचे जाहिर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे विहित मुदतीत विकास आराखडा सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे सदर कॉलेज वाशिम येथून तेलंगणा राज्यात मंजूर झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर विद्यापीठातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासोबतच सदर कॉलेज वाशिम मध्येच रहावे यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे. केंद्र शासनाने रुसा अंतर्गत नंदूरबार व वाशिम या दोन जिल्हांमध्ये मॉडल डिग्री कॉलेज सुरु करण्यास मंजूरी दिली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथील नियामक मंडळाद्वारे नेमलेल्या अध्यापकांच्या समस्यांबाबत**

**(४९) १३३६१९ (०४-१२-२०१८) श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे या संस्थेस शासनातर्फे सन २००२ मध्ये संपूर्ण स्वायत्तता प्रदान करण्यात आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे या संस्थेस २३३ अध्यापकीय व प्रशासकीय पदे मंजूर करून त्याची आर्थिक जबाबदारी स्वीकारुन मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त संस्थेच्या नियामक मंडळास शैक्षणिक गरजेनुसार अध्यापकिय व प्रशासकीय पदे भरण्यास व नवीन पदे निर्मित करून नियुक्ती करण्यास परवानगी देण्यात आली असून सदर नियामक मंडळाच्या वतीने करण्यात आलेल्या अध्यापकांच्या नियुक्त्या खुल्या त्रिस्तरीय पद्धतीने पूर्वीच्या शासकीय सेवेतील शर्ती कायम राहण्याच्या नियमानुसार करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत पाच महिन्यापासून (जून २०१८) अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे यांच्या नियामक मंडळाने अध्यापकिय व प्रशासकीय पदावर कार्यरत असणाऱ्यांचे वेतन प्रलंबित ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सदर संस्थेने नेमलेल्या अध्यापकांना राज्यातील इतर अनुदानित संस्थामध्ये कार्यरत असलेल्या अध्यापकाप्रमाणे सवलती, निवृत्ती वेतन योजना, विमा योजना, डी.सी.बी.एस., एन.पी.एस., जी.आय.एस., कालबद्ध पदोन्नतीचा लाभ व उन्नत वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येत नसल्याबाबतचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार सदर संस्थेच्या अध्यापिकांच्या विविध मागण्याबाबत उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत तसेच अध्यापिकांचे गत ५ महिन्यापासून चे थकीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०१-२०१९) :** (१). अंशतः खरे आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेस दिनांक १९/०७/२००२ शासन निर्णयान्वये प्रशासकीय, वित्तीय व व्यवस्थापकीय स्वायत्तता प्रदान करण्यात आलेली आहे. शैक्षणिक स्वायत्तता ही संबंधीत विद्यापीठाने संस्थेस प्रदान केलेली आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १९/०७/२००२ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेमध्ये सदर शासन निर्णय निर्गमित होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची आर्थिक जबाबदारी शासनाची आहे. स्वायत्तता मिळाल्यानंतर संस्थेतर्फे नियुक्त केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची संपूर्ण जबाबदारी संस्थेची आहे.
(३) अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेच्या नियामक मंडळास शैक्षणिक गरजेनुसार अध्यापकीय व प्रशासकीय पदे निर्माण करून सदर पदावर नियुक्ती करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, नियामक मंडळाने शासन मान्य पदांवर तसेच, संस्थास्तरावर निर्माण केलेल्या पदांवर अध्यापकांच्या नियुक्त्या करताना विहीत पद्धतीचा अवलंब करण्यात आला नसल्याबाबत या प्रकरणी नेमण्यात आलेल्या मेश्राम समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे.
(४) अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे या संस्थेतील शासन मंजूर पदावर संस्थेच्या नियामक मंडळामार्फत नियुक्त केलेल्या आहेत. अशा अध्यापकांची वेतने शासकीय तिजोरीतून अदा करण्यात येत असल्याने संस्थेने सादर केलेल्या वेतन देयकास शासकीय कोषागार कार्यालयाने आक्षेप लावले आहेत. तथापि, संस्थेने समाधानकारक खुलासा न केल्याने कोषागार कार्यालयाने संबंधीत अध्यापकांचे माहे जून, २०१८ पासून वेतन देयके प्रलंबीत ठेवलेली आहेत.
(५) होय.
(६) प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका प्रलंबीत असून त्या अनुषंगाने दिनांक २२.१२.२०१८ रोजी अंतिम सुनावणी झाली असून अंतिम निकालासाठी याचिका प्रलंबीत आहे. सबब, प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल.

---

**अकोला ग्रामीण शिधा पुरवठा विभागातील डी वन रजिस्टर अद्ययावत नसल्याबाबत**

**(५०) १३४१९१ (२९-१२-२०१८) श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर)** : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काही कारणास्तव शिधापत्रिकेतील सदस्य संख्या कमी होवूनही रास्त दुकानदारांच्या धान्य पुरवठयामध्ये त्या प्रमाणात कपात केली जात नाही परंतु वाढीव सदस्यांची संख्या असल्यास ते तात्काळ मान्य करुन त्याचे नियतनही वाढविले जात असल्याचे अकोला ग्रामीण पुरवठा विभागात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर माहिती अद्ययावत करण्यासाठी बंधनकारक असलेले डी वन रजिस्टर देखील अद्ययावत ठेवण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०६-०२-२०१९) :** (१) अकोला ग्रामीण अंतर्गत शिधापत्रिकेतील सदस्य संख्या कमी केल्यास त्या शिधापत्रिकेतील सदस्यांचे नियतन कमी करून दुकानदारांना धान्य मंजुर करण्यात येते. तसेच वाढीव सदस्यांचे वाढीव ईष्टांकानुसार दुकानदारांना धान्य मंजुर करण्यात येते.

(२) सर्व डी वन रजिस्टर अद्यावत ठेवण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.